# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**महासभा दि. ३०/१०/२००९**

आज शुक्रवार दि. ३०/१०/२००९ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०३ दि. २०/१०/२००९ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | नरेंद्र मेहता | महापौर |
| २) | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | उपमहापौर |
| ३) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील जयंत महादेव | सभागृह नेता |
| ५) | दिव्या अशोक तिवारी | सदस्या |
| ६) | म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| ७) | शानू जो. गोहिल | सदस्या |
| ८) | पाटील उमाताई शाम | सदस्या |
| ९) | वैती नर्मदा यशवंत | सदस्या |
| १०) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| ११) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १२) | नलावडे दिनेश दगडू | सदस्य |
| १३) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १४) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १५) | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | सदस्य |
| १६) | पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १७) | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | गटनेता |
| १८) | पाटील धनेश परशुराम | गटनेता |
| १९) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| २०) | पाटील शरद केशव | सदस्य |
| २१) | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर (गाडोदिया) | गटनेता |
| २२) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| २३) | पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| २४) | व्यास सुधा वासुदेव | सदस्या |
| २५) | फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| २६) | म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| २७) | पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| २८) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| २९) | डिमेलो बर्नड आल्बर्ट | सदस्य |
| ३०) | बाविघर सिसिलीया विजय | सदस्या |
| ३१) | परेरा टेरी पॉल | सदस्य |
| ३२) | सावळे निर्मला बाबुराव उर्फ कांबळे निर्मला विष्णू | सदस्या |
| ३३) | कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| ३४) | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | सदस्या |
| ३५) | ठाकुर प्रकाश पांडुरंग | सदस्य |
| ३६) | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | सदस्य |
| ३७) | शर्मा भगवती | गटनेता |
| ३८) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३९) | भोईर शशिकांत जगन्नाथ | सदस्य |
| ४०) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ४१) | पाटील प्रफुल्ल काशीनाथ | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४२) | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | सदस्य |
| ४३) | वर्षा भानुशाली | सदस्या |
| ४४) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| ४५) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ४६) | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | सदस्या |
| ४७) | जंगम लक्ष्मण गणपत | सदस्य |
| ४८) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ४९) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ५०) | पुजारी कांचन शेखर | सदस्य |
| ५१) | मुंज वासुदेव भास्कर | सदस्य |
| ५२) | सय्यद नुरजहाँ नझर हुसैन | सदस्या |
| ५३) | शेख नुर मोहम्मद अेहमद | सदस्य |
| ५४) | खान शफीक अहमद सादत | गटनेता |
| ५५) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ५६) | पालांडे प्रशांत भगवंतराव | सदस्य |
| ५७) | ठाकूर कल्पना हरिहर | सदस्या |
| ५८) | म्हात्रे चंद्रकांत खंडोजी | सदस्य |
| ५९) | मोदी चद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ६०) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| ६१) | दुबे रामनारायण सदानंद | सदस्य |
| ६२) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ६३) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ६४) | चक्रे वंदना रामदास | सदस्या |
| ६५) | शेख सलिम दाउद | सदस्य |
| ६६) | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | सदस्य |
| ६७) | माळी हेमा रविंद्र | सदस्या |
| ६८) | हसनाळे जोत्सना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | सदस्या |
| ६९) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ७०) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ७१) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ७२) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ७३) | संजय पांगे | नामनिर्देशित सदस्य |
| ७४) | अरुण कदम | नामनिर्देशित सदस्य |
| ७५) | प्रकाश दुबोले | नामनिर्देशित सदस्य |

**<u>गैरहजर सदस्य –</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| २) | शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| ३) | पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| ४) | आसिफ पटेल | नामनिर्देशित सदस्य |
| ५) | वैती विजया हेमचंद्र | सदस्य |

**<u>रजेचा अर्ज –</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| २) | परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |

(राष्ट्रीय गीत वंदे मातरमने सभेला सुरुवात करण्यात आली.)

**मा. महापौर :-**

सचिव साहेब, सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी. सन्मा. नगरसेवक शफीक अहमद खान यांचे पत्र आलेले आहे. विरोधी पक्षनेता ह्यांचे नाव देण्याबाबत. पत्राचे सभागृहात वाचन करा.

**नगरसचिव :-**

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा शुक्रवार दि. ३०/१०/२००९ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०३, दि. २०/१०/२००९ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.

प्रति,
मा. महापौर साहेब,
मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय :- विरोधी पक्षनेतेपदासाठी नाव देणेबाबत.

महोदय,

मी आपणांस आजच्या महासभेमध्ये विरोधी पक्षनेत्याचे नाव खाली नमुद केलेले नाव घोषीत करावे.

नांव - श्री. लक्ष्मण गणपत जंगम (विरोधी पक्षनेता)

मान्यवरांस सादर,

प्रत माहितीसाठी :-

१) मा. आयुक्त साहेब, मि.भा.म.न.पा.
२) मा. नगरसचिव साहेब, मि.भा.म.न.पा.

**आपला कृपाभिलाषी**

**सही/-**
**(शफीक अहमद सादत खान)**
**गटनेता,**
**संयुक्त लोकशाही आघाडी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**एस. ए. खान :-**

मा. महापौर साहेब, आमचे विरोधी पक्षनेता, नगरसेवक चंद्रकांत वैती ह्यांनी राजीनामा दिला याकरीता नविन विरोधी पक्षनेत्याच्या नावाचे पत्र दिलेले आहे. श्री. लक्ष्मण जंगम ह्यांचे नाव घोषीत करीत आहे.

**मा. महापौर :-**

पत्राचे मी वाचन करीत आहे. मी आपणांस आजच्या महासभेस विरोधी पक्षनेता म्हणून श्री. लक्ष्मण गणपत जंगम यांचे नाव घोषीत करत आहे. श्री. चंद्रकांत वैती, विरोधी पक्षनेता ह्यांनी राजीनामा दिल्याने नविन विरोधी पक्षनेता निवडण्यासाठी श्री. शफीक अहमद खान यांचे पत्र आलेले आहे. तर त्याप्रमाणे श्री. लक्ष्मण गणपत जंगम ह्यांना विरोधी पक्षनेता म्हणून घोषीत करत आहे. अभिनंदन.

(सभा १० मिनिटांकरिता तहकुब करण्यात आली.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २१, महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्य पदासाठी नियुक्ती करणे. मागील समितीत १३ सदस्य आणि एक स्विकृत असे १४ सदस्य व अध्यक्ष, आयुक्त असे १५ सदस्यांची संयुक्तिक समिती गठीत केलेली होती. त्याप्रमाणे सदस्यांची नावे .....

**जयंत पाटील :-**

सचिवजी, सभा चालू होण्याच्या अगोदर या शहराचे प्रथम नगराध्यक्ष ज्यांनी आपल्या पत्नीला प्रथम महापौर बनवले व ज्यांनी या गद्दाराला इकडे बसवले ते आमचे श्री. गिल्बर्ट मेन्डोसा यांचा सत्कार करण्यासंबंधी इथे चर्चा करायची आहे आणि ती चर्चा आम्हाला, त्यांचा सत्कार आम्हाला आयुक्तांच्या हातून व्हायला पाहिजे. कुठल्याही गद्दाराच्या हातून आमच्या नेत्याचा सत्कार आम्ही करणार नाही. ज्यांनी राष्ट्रवादी बरोबर गद्दारी करुन दोन सीट असतानाही आम्ही त्याला तिथे बसवलेले आहे. त्याला खरं म्हणजे आजसुध्दा बशरमपणे इथे बसायला नको होते. त्याची लायकी नाही, त्या माणसाची. ज्या सत्कारा संदर्भात आम्हाला चर्चा करायची आहे. या शहराचे आमदार आपल्याकडे दोन आमदार आहेत. एक श्री. गिल्बर्ट मेन्डोंसा १४५ मिरा भाईंदर मधून दुसरे १४६ मधून श्री. प्रताप सरनाईक आहेत आणि खासदार या तिघांचा सत्कार आपल्याला करायचा आहे. तो कधी करायचा, काय करायचा ते सभागृह ठरवेल आणि त्याप्रमाणे त्या सत्काराची तारीख आणि ते कशात-हेने करणार हे तुम्ही ठरवा.

**नगरसचिव :-**

सभागृहाने ठरवायचे आहे ते कधी करायचे आहे.

**जयंत पाटील :-**

करतील चर्चा. आम्ही तुम्हाला तसे पत्र दिलेले आहे.

**अरुण कदम :-**

तारीख द्या, अन्यथा आपण बसून ठरवू या.

**नुरजहॉ हुसैन :-**

तुम्ही तारीख द्या म्हणजे ते सगळ्यांना माहित पडेल.

**अरुण कदम :-**

त्याला ऑब्जेक्शन असण्याची गरज नाही.

**दिनेश नलावडे :-**

सत्काराची तारीख राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि आम्ही बसून आपल्याला नंतर कळवू. त्या पध्दतीने आपण नक्की करु आणि सदर सभेस सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

विषयाचे वाचन केलेले आहे.

**मा. महापौर :-**

नियमाप्रमाणे एकूण किती किती सदस्य येतील?

**नगरसचिव :-**

राष्ट्रवादी कॉंग्रेस - ४, कॉंग्रेस - ६, बीजेपी - २, शिवसेनेला १ असे १३ आणि १ स्विकृत सदस्य आहे तो कॉंग्रेस पक्षातून असेल.

**अनिल सावंत :-**

सचिव साहेब, कॉंग्रेस म्हणजे संयुक्त लोकशाही आघाडी.

**नगरसचिव :-**

होय.

**मा. महापौर :-**

आपआपल्या पक्षाची नावे गटनेत्यांनी द्यावीत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, आज जेव्हा विषयपत्रिका पाठवली गेली. मी सचिव साहेबांना भेटलो होतो की, एका सदस्याने राजीनामा दिलेला आहे व दुसरा सदस्य बाद झालेला आहे. म्हणून या सभागृहाच्या गणसंख्येमध्ये फरक झालेला आहे. यावेळी निवडणूक होताना कशी कशी गणसंख्येप्रमाणे कोणाचे किती सदस्य यावेळी जातील याची आपण माहिती दिली पाहिजे होती ती दिली नाही. आता तरी द्या. या गोष्टीला ४८ तास गेले म्हणजे आज जो गोंधळ सचिव साहेबांना उभा केलेला आहे. प्रत्येकवेळी गणसंख्येप्रमाणे किती सदस्य जाणार याची नोंद देता. यावेळी नोंद का दिली नाही? सचिवांनी पहिल्यांदा त्याचा खुलासा करावा. मी नाव देतोय पण सभागृहामध्ये मिसगाईड करुन सचिवांनी ही परिस्थिती का उद्‌भवली?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी यापुढे काळजी घेतली जाईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हमारे पक्ष का सवाल है। पक्षभेदी हमारी मंतरा होती है। हम नाम देते वक्त विचार करते है। आज आपने एकदम सडनली बोला दो नाम जाएगा और हमने कल उनको पुछा भी।

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, खुलासा पाहिजे. आता जसे नविन नियमाप्रमाणे कोणी सदस्याने राजीनामा दिला तर त्याठिकाणी त्याच पक्षाचा पुन्हा सदस्य जातो. असा ही नियम आहे ना?

**मा. महापौर :-**

चारही गटनेत्यांचे पत्र आलेले आहे. राष्ट्रवादी पक्षातर्फे गटनेता भगवती शर्मा ह्यांनी चार नावे सुचवलेली आहेत. (१) सौ. कॅटलीन परेरा (२) सौ. ज्योत्स्ना हसनाळे (३) सौ. हेमा रविंद्र माळी (४) सौ. नर्मदा वैती. शिवसेनेतर्फे श्री. अनंत रामचंद्र पाटील यांनी श्री. अनंत रामचंद्र पाटील याचें नाव सुचवलेले आहे. संयुक्त लोकशाही आघाडीतर्फे गटनेता, श्री. शफीक अहमद सादत खान यांनी ६+१= ७ नावे आलेली आहेत. (१) सौ. मर्लिन डिसा (२) सौ. दिप्ती शेखर भट (३) सौ. कल्पना ठाकूर (४) सौ. उमा विश्वनाथ सपार (५) श्री. नुर महमंद शेख (६) सौ. सुनिता शशिकांत भोईर आणि स्विकृत सदस्यामध्ये श्री. ॲन्थोनी एलेझार मेनेजीस यांचे नाव आलेले आहे आणि भारतीय जनता पार्टीतर्फे गटनेता, श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांच्यातर्फे दोन नावे आलेली आहेत. (१) सौ. कल्पना महेश म्हात्रे (२) श्री. रामनारायण दुबे, एकूण १४ नावे आलेली

आहेत. ही १४ नावे मी स्विकारत आहे व समिती घोषीत करत आहे. ही कमिटी एक वर्षाकरीता घोषीत करत आहे.

**प्रकरण क्र. २१ :-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्य पदासाठी नियुक्ती करणे.

**ठराव क्र. २५ :-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण समितीवर ९ पालिका सदस्यांची नियुक्ती होणे आवश्यक आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम ३१ अ (३) अन्वये मा. वृक्ष प्राधिकरण समिती सदस्य नेमणूकीबाबत मा. महासभेस अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार आहेत.

त्यानुसार वृक्षप्राधिकरण समितीवर खालील सदस्यांची एक वर्षाच्या मुदतीकरिता नियुक्ती करण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **सदस्यांचे नाव** | **फ्रंट / आघाडी** |
|---|---|---|
| १. | सौ. मर्लिन डिसा | संयुक्त लोकशाही आघाडी |
| २. | सौ. दिप्ती शेखर भट | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ३. | सौ. कल्पना हरिहर ठाकूर | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ४. | सौ. उमा विश्वनाथ सपार | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ५. | श्री. नुर मंहमद शेख | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ६. | सौ. सुनिता शशिकांत भोईर | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ७. | सौ. कॅटलीन एंथोनी परेरा | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ८. | सौ. ज्योत्स्ना हसनाळे | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ९. | सौ. हेमा रविंद्र माळी | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| १०. | सौ. नर्मदा वैती | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ११. | सौ. कल्पना महेश म्हात्रे | भारतीय जनता पार्टी |
| १२. | श्री. रामनारायण दुबे | भारतीय जनता पार्टी |
| १३. | श्री. अनंत रामचंद्र पाटील | शिवसेना |
| १४ | श्री. ॲन्थोनी एलेझार मेनेजीस | नामनिर्देशित सदस्य |

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर तथा पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

सचिव साहेब दुसरा विषय घ्या.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २२, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २० (३) अन्वये मा. स्थायी समितीच्या रिक्त होणाऱ्या निम्मे आठ (८) सदस्यांच्या जागी, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २० (५) अन्वये नवीन आठ सदस्यांच्या नेमणूकीकरिता. तसेच स्थायी

समितीच्या एक सदस्याने राजिनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ चे प्रकरण २ कलम २३ अन्वये एक सदस्याची नेमणूक करणे.
निवृत्त होणाऱ्या सदस्यांची नावे खालीलप्रमाणे :-

१) श्री. मॉरस जोजफ रॉड्रीक्स
२) श्री. तुळशीदास दत्तू म्हात्रे
३) श्री. मिलन वसंत म्हात्रे
४) श्रीम. शानु जोरावर गोहिल
५) श्रीम. सुनिता कैलास पाटील
६) श्री. ध्रुवकिशोर मंसाराम पाटील
७) श्री. प्रकाश पांडुरंग ठाकूर
८) श्री. टेरी पॉल परेरा.

राजीनामा दिलेल्या सदस्याचे नाव :-

१) श्री. प्रकाश जिलेदार सिंग

**मा. महापौर :-**

एकूण किती सदस्य जातील ते कुठल्याप्रकारे सदस्यांची नाव द्यायची त्यांचीही माहिती द्या.

**नगरसचिव :-**

मी प्रथम निवेदन करतोय. आठ सदस्यांप्रमाणे जर घेतले तर ३७ सदस्यांच्या मागे ४ म्हणजे संयुक्त लोकशाही आघाडीचे - ४, राष्ट्रवादी कॉंग्रेस - ३ आणि अपक्ष - १ व राजीनामा दिलेल्या बीजेपीला - १ असे येते. परंतु, नाशिक कोर्टाच्या निकालाप्रमाणे, हायकोर्टाच्या निर्णयाप्रमाणे केले तर......

**प्रकाश दुबोले :-**

सचिव साहेब, तुम्हाला कोर्टाचे निकाल कोणी विचारलेले नाहीत. जो नियम आहे तेवढेच सांगा. बाकीच्या गोष्टी आम्हाला सांगु नका. आम्ही तुम्हाला विचारलेले नाही. त्यामुळे जे झालेले आहे जेवढे सदस्य निघाले आहेत तेवढेच घेण्याचा निर्णय तुम्ही बोला. कोर्टाचे निर्णय वगैरे तुम्हाला कोणी विचारलेले नाही आणि त्याची इथे आवश्यकता नाही. चुकीची काहीतरी माहिती देवून तुम्ही विषय येथे वाढवू नका.

**नगरसचिव :-**

आपण मला माझे निवेदन करु द्या.

**प्रकाश दुबोले :-**

तुमच्या निवेदनाता त्याचा संबंध काय? जे सदस्य निघाले आहेत तेवढेच तुम्ही घ्या.

**मा. महापौर :-**

त्यांचे स्वतःचे दोन मत झाले आहे आणि ते दोन्ही मत ते सभागृहापुढे मांडत आहेत.

**जयंत पाटील :-**

तुम्हाला न विचारलेल्या गोष्टीची येथे वाच्यता करु नका.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर साहेब, नियमाप्रमाणे आहे तेवढेच वाचन करा.

**भगवती शर्मा :-**

पिछले बार सन २००८ अक्टूबर मे एक पत्र आया उसके नुसार चुनाव हुआ। उनका अहवाल देना चाहिए की, वह २००७ का निर्णय देना चाहिए। यह हमेशा ऐसा दो निर्णय लेते है। हमेशा सभा के अंदर ऐसी हरकत करते है।

**मिलन पाटील :-**

सचिव साहेब, तुमच्यावर या गोष्टीवर कोणी ऑब्जेक्शन घेतले आहे का? तुम्हाला कोणी विचारले आहे का? की कोर्टाचा निर्णय काय आणि हा नियम काय? नियम आम्हालासुध्दा कळतात. तुम्ही जे पुस्तक...

**भगवती शर्मा :-**

तुम्हाला असे पत्र आले होते का?

**नगरसचिव :-**

पत्र आलेले, माझ्याकडे तसे पत्र आहे. पत्र वाचून दाखवतो.

**मिलन पाटील :-**

सचिव साहेब, जे पुस्तक तुम्ही वाचता तेच पुस्तक आम्ही वाचतो. आम्हाला कशाला नियम शिकवायला पाहिजे?

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, सचिव साहेबांनी जे न्यायालयीन निर्णय घेतले आहेत त्याचे आम्हाला आकलन झाले पाहिजे. कारण बऱ्याचशा कल्याण-डोंबिवली, नाशिकला स्थगिती लागलेली आहे. स्थायी समितीला सहा महिने स्टे होता. त्याकरीता आम्ही विचारतोय आता की, ते न्यायालयीन आदेश काय आहेत ते वाचून दाखवा.

**भगवती शर्मा :-**

स्थायी यमितीमध्ये २००८ चे पत्र तर त्या नियमाप्रमाणे .....

**मिलन म्हात्रे :-**

आम्हाला आकलन झाले पाहिजे. स्थायी समितीच्या इलेक्शनला न्यायालयीन आदेश काय आहेत?

**नगरसचिव :-**

नाशिकच्या ह्याच्यामध्ये १६ प्रमाणे सदस्य संख्या काढावी असे ठरले. त्याप्रमाणे संयुक्त लोकशाही आघाडीकडे - ५, राष्ट्रवादी काँग्रेस - २ आणि अपक्ष - १ असे नाशिक महापालिकेकरीता हायकोर्टाने दिलेल्या निर्णयाबद्दल असे आहे सदर बाबत .....

**मिलन म्हात्रे :-**

कारण आता जी ट्री-ॲथोरीटी नियुक्त झाली. त्याला आमचा विरोध आहे. विरोध नोंदवून घ्या. कारण तुम्हाला जे सन्मा. सदस्य खान साहेबांचे पत्र आले आहे त्यानुसार आम्हाला कुठेही प्राधान्य दिलेले नाही. ट्री-ॲथोरीटीलाही आमचा विरोध नोंदवून घ्या.

**नगरसचिव :-**

अशा पक्षाच्या किंवा गटाच्याभोवती नामनिर्देशन करायच्या पालिकेच्या सदस्य संख्येबाबत कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास त्याबाबतीत महापालिकेचा निर्णय हा अंतिम असेल.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, बरोबर एक वर्षापूर्वी हाच प्रश्न उपस्थित झाला होता, स्थायी समितीच्या सदस्यांच्या बाबतीत. त्यावेळी प्रत्येक पक्षाच्या नगरसेवकांच्या संख्येमध्ये फरक पडला नव्हता. त्यामुळे ज्या पक्षाचे सदस्य निवृत्त होत होते. तेवढेच सदस्य स्थायी समितीमध्ये जाणार असा निर्णय आपण सचिव साहेब दिला होता. पण आजची परिस्थिती थोडी बदलेली आहे. काँग्रेसच्या एका नगरसेवकाने राजीनामा दिलेला आहे आणि एका नगरसेविकेचे नगरसेवक पद रद्द झालेले आहे. त्यामुळे त्यांच्या तौलानिक संख्याबळामध्ये फरक पडतोय. त्यामुळे जितक्या सदस्यांचे राजीनामे तेवढेच सदस्य जाणार हा नियम आज याठिकाणी लावणे चुकीचे आहे.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, सभागृह हे कायद्याप्रमाणे चालावे अशी अपेक्षा आहे. शासनाचे, हायकोर्टाचे वेळोवेळी निर्देश येत असतात. त्याप्रमाणे सभागृह चालावे ही अपेक्षा आहे. स्थायी समितीच्या सदस्यांची नियुक्ती होण्याचा हा जो विषय आलेला आहे. शासनाचे स्पष्ट निर्देश आहेत आणि त्याप्रमाणे गेल्या वर्षी ८ जणांची नियुक्ती झाली. त्यालासुध्दा तौलानिक संख्याबळाचा नियम लावतेवेळी १६ जणांचा विचार केला गेला होता. शासनाचा जो जी.आर. आहे, मा. गटनेते भगवती शर्माने त्याचे निर्देश केलेले आहेत. त्याच्यामध्ये असे निर्देश आहेत की, ज्यादिवशी स्थायी समिती सदस्यांची नियुक्ती होणार असेल त्या दिवशीचे सभागृहाचे तौलानिक संख्याबळाचा विचार करुन एकूण सदस्य संख्या १६ आहे. त्याला तो नियम लावावा आणि त्याबाबतीत नाशिक महानगरपालिकेचे, हायकोर्टाचे निर्देश स्पष्ट आहेत त्यामुळे तिथे गैरसमज होण्याची गरज नाही. हाच नियम जर गेल्यावर्षी लावला असता तर संयुक्त लोकशाही आघाडीचे चार सदस्य गेले असते. पण त्यावेळी तौलानिक संख्याबळाचा १६ जणांचा नियम लावला गेला आणि त्यामुळे संयुक्त लोकशाही आघाडीचे तीनच सदस्य गेले. आज ५ सदस्य निवृत्त होत आहेत आणि ह्या तौलानिक संख्याबळाचा विचार केल्यानंतर त्यांचे जे एक्वीऐशन येतेय ३७ मेम्बरला आउट ऑफ ७७ आता सभागृहामध्ये एक विरोधी पक्षनेत्याने राजीनामा दिलेला आहे आणि एक जे सदस्य आहे त्यांची केस कोर्टामध्ये चालू आहे. तर ७७ च्या सभागृहामध्ये जे संयुक्त लोकशाही आघाडीचे ३७ नगरसेवक आहेत. त्याप्रमाणे ५ सदस्य संयुक्त लोकशाही आघाडीचे स्थायी समितीमध्ये जायला पाहिजे तरच ती संख्या ८ होणार. कारण त्यासाठी ते ३७ नगरसेवकांना जे एक्वीऐशन येत आहे ते ७.६८८ येत आहे आणि त्या हिशोबाने ही नियुक्ती करावी अशी मी आपल्याला विनंती करतोय.

**भगवती शर्मा :-**

सन्मा. सदस्य अनिल सावंत इन्होने ठिक कहा । जब संख्या बदल होती हे तो बदलेके अनुसार ही इलेक्शन होते है । इस समय राष्ट्रवादी की २१ संख्या, संयुक्त लोकशाही आघाडी की ३७ संख्या लेकीन इलेक्शन १६ सदस्योका नही हो रहा है । इलेक्शन ८ सदस्योका हो रहा है । निवृत्त सदस्य ८ हो रहे है । एकने राजीनामा दिया है, हम वह राजीनामा को संख्याबल मे नही पकड रहे है । इसीलीए ८ संख्यो के अनुसार के अंदर मे संख्याबल के अंदर मे जिनको जीतना प्रतीनिधीत्व मिलना चाहिए इसी प्रतिनिधीत्व के अनुसार यह प्रतीनिधीत्व दिया जा रहा है। उसके अंदर मे एक लास्ट लाईन दिया हुआ है संख्या बदल होती हे तो अपक्ष का भी गट होता है। उसको भी उसका फायदा मिलना चाहिए यहापर तीन सदस्योने गट बनाया है, वहा पर इस संख्या के अनुसार उनको भी प्रतिनिधीत्व मिलता है। यह व नए ३० (ए) के नियमानुसार मिल रहा है। सकारने यह नियम इसीलीए बनाए है तो यह समजना करके १६ की संख्या उस समय थी तो १६ के अंदर मे ७९ मे इफेक्ट पडता है तो उसके हिसाब से प्रतिनिधीत्व मिलना चाहिए था। लेकीन आज संख्या ८ का चुनाव कर रहे है, आपने विषय पत्रिका के अंदर भी दिया है की, २०/५ अन्वये नवीन ८ सदस्यांची

नेमणूकीकरिता ८ सदस्य की अगर आपको नेमणूक करनी है तो उसी नियम को कानुन के संख्याबल के अनुसार २१ को जो मिलना चाहीए वह २१ को मिलना चाहिए और ३७ को जो मिलना चाहिए वह ३७ को मिलना चाहिए, तीन सदस्य संख्या तीन को मिलना चाहिए, ९ का जो है उसके नुसार ९ को मिलना चाहिए और ५ का तो ५ को मिलना चाहिए। मेरा यह निवेदन है की, इस मे यह गैरसमज ना करे जो आपने नासीक का बताया है वह नासीक के पहले जजमेंट हुआ था, उसके बाद जो अपनो को श्री. फ.ब.खान का पत्र आया हुआ है, अब श्री. फ.ब.खान के पत्र के अंदर यह उल्लेख था। पिछली बार स्थायी समिती मे भी आप उल्लेख कर रहे थे। लास्ट मे उसके हिसाब से इलेक्शन लगाना पडा।

**मा. महापौर :-**

मागच्यावेळी आपण १६ ने केले की ८ ने ।

**अनिल सावंत :-**

१६ ने .... ८ ने केले असते तर आमचे ४ जात होते, मा. महापौर साहेब, मागच्या वेळी सुध्दा ८ च निवृत्त झाले होते.

**एस.ए.खान :-**

गेल्यावर्षी आमचे तीन गेले तर ते चार जाणार होते, पण त्या लेटरप्रमाणे आमचे तीनच गेले. संख्याबळ आजपण तेवढेच आहे. त्याच्यामध्ये एवढा काय प्रॉबलेम नाही, जे आमचे निघालेले आहेत तेवढेच जायला पाहिजे.

**भगवती शर्मा :-**

लेकीन उस वक्त सदस्य संख्या मे बदल नही हुआ था। लेकीन अभी संख्या मे बदल हो रहा है। ३७ के अनुसार कॅलक्युलेशन कर रहे है ना, हम कहा मना कर रहे है।

**एस.ए.खान :-**

कायदेप्रमाणे ५ गेले पाहिजे, ५ निवृत्त होत आहेत,

**मा. महापौर :-**

१६ डिवायडेड बाय ८.

**भगवती शर्मा :-**

डिवायडेड बाय ८ आप चुनाव कितनेका लगा रहे है ?

**मा. महापौर :-**

मागच्यावेळी पण ८ जन होते त्यावेळी आपण डिवायडेड बाय ८ केले की १६ केले ?

**अनिल सावंत :-**

१६ ने केले होते.

**नगरसचिव :-**

ह्यांचे जसे निवृत्त होतील तसेच केले होते.

**एस.ए.खान :-**

तो रुलच आहे ना।

**भगवती शर्मा :-**

जिसका जो जितना रिटयर्ड हो गया तब तक की संख्याबल के अंदर मे परिवर्तन नही हो। उस समय संख्याबल मे कोई परिवर्तन नही था। उसमे जिसका जितना गया उतना आया। पर आज संख्याबल मे फरक आ रहा है। ३७ हो रहा है और यहा २१ हो रहा है। इसके लीए अब उसके नुसार आपकी कॅलक्युलेशन की जाएगी। सचिवजी भ्रमीत मत किजीएगा और किसीके कहनेसे भ्रमीत मत होईएगा, सभा कामकाज के नियम के अनुसार आप चलाईए।

**अरुण कदम :-**

जे आहे ते तुम्ही कायद्या प्रमाणे करा.

**भगवती शर्मा :-**

इसके बाद भी ८ का चुनाव था, लेकीन उस समय संख्याबल फरक नही पडा था। और उसके अंदर में यह स्पष्ट लिखा हुआ है की, नोंदणीकृत पक्षाचे, गटाचे, आघाडीचे, आघाडीचे अथवा फ्रंटचे नवीन सदस्य स्थायी समितीवर नेमणे अध्यारूत आहे. जेणेकरून बलाबलानुसार प्रतिनिधीत्व देण्याबाबतच्या तरतुदीची पुर्तता होउ शकेल. तसेच कोणत्याही समितीच्या कोणत्याही कारणामुळे रिक्त होणाऱ्या जागांवर निवृत्त झालेला सदस्य ज्या मान्यता प्राप्त पक्षाचा, नोंदणीकृत पक्षाचा, गटांचा, आघाडीचा किंवा फ्रंटचा असेल त्याच मान्यता प्राप्त पक्षाच्या, नोंदणीकृत पक्षाच्या, गटाच्या, आघाडीच्या किंवा फ्रेंटच्या सदस्यास नामनिर्देशित करणे अपेक्षित आहे. मात्र अशा वेळीस पुर्वीच्या तुलनेने पक्षांच्या/गटांच्या तौलानिक संख्येत बदल झालेला नसावा. उस समय वह बदल नही था। आज बदल हुआ है, बदल के अनुसार आप उसकी कॅलक्युलेशन करेंगे।

**अनिल सावंत :-**

सचिव साहेब, विधी डिपार्टमेंट कडुन आपण काहितरी स्पस्टीकरण मागीतले असेल ना या बाबतीत काहीतरी मार्गदर्शन मागीतले असेल.

**नगरसचिव :-**

मागचे श्री. फ.ब.खान चे पत्र आहे आणि हे नाशीक कोर्टाच जजमेंट आहे.

**अनिल सावंत :-**

मग त्यांनी तुम्हाला काय सांगितले ?

**जयंत पाटील :-**

तुम्ही हे सांगा, श्री. फ.ब.खानचे पत्र नंतर आलेले आहे, नाशीक कोर्टाचे जजमेंट नंतरचे श्री. फ.ब.खानचे २००८ चे पत्र आहे आणि नाशीक कोर्टाचे पत्र २००६ सालचे आहे.

**अनिल सावंत :-**

नगरसचिव डिपार्टमेंट कडुन त्यांनी मार्गदर्शन मागवले असेल ना ?

**नगरसचिव :-**

श्री. फ.ब.खानचे पत्र वाचुन दाखवतो.

**अनिल सावंत :-**

सर्वांनजवळ पत्र आहे कॉपी आहे, आता कसे आहे महापौर साहेब, त्या पत्राचा आपल्या सोयीनुसार अर्थ काढला जातोय, प्रत्येकवेळी सभागृह हे दादागीरीने चालु शकत नाही, नियमाप्रमाणे चालले पाहिजे. म्हणजे आपल्या सोयीनुसार प्रत्येक पत्राचा प्रत्येक कायद्याचा आपल्या सोयीनुसार उपयोग करायचा. त्यांना जे प्रतिनिधीत्व आहे २१ जणांचे १६ जणांमध्ये त्यांना ते मिळायलाच पाहिजे. अपक्षाचा गट आहे, त्यांना सुध्दा ते प्रतिनिधीत्व मिळायलाच पाहिजे, त्याच प्रमाणे संयुक्त लोकशाही आघाडीचे जे ३७ सदस्य आहेत त्यांना सुध्दा प्रतिनिधीत्व मिळाले पाहिजे, नाहीतर जर ही नेमणूक त्या प्रमाणे झाली नाहीतर कल्याण-डोंबिवली महानगरपालिके सारखाच प्रकार या ठिकाणी होणार आहे. स्टे येणार आहे, तुम्ही नगरविकास खात्याकडुन मार्गदर्शन मागीतले त्यांनी काय सांगीतले तुम्हाला?

**नगरसचिव :-**

जसे निवृत्त होतात तसे घ्यायचे, पण तौलानीक संख्येत बदल झाल्याने येथे आपल्याला अडचण झाली.

**अनिल सावंत :-**

त्याच्यावर तुम्ही मार्गदर्शन मागीतले असेल ना।

**नगरसचिव :-**

फोनवर बोललो, जसे निवृत्त झाले तसेव घ्यायचे आहे.

**अनिल सावंत :-**

तुम्ही फोनवर बोललात तर त्यांनी तुम्हाला काय सांगीतले ?

**नगरसचिव :-**

जेवढे निवृत्त झाले तेवढेच घ्यायचे आहे.

**अनिल सावंत :-**

मग हाच नियम तुम्ही गेल्या वेळेस का नाही लावला ?

**नगरसचिव :-**

गेल्यावेळी ५ आणि ३ निवृत्त झाले होते, त्याप्रमाणे ३ आणि ५ उलटे आपण घेतलेच.

**भगवती शर्मा :-**

उस समय संख्या मे बदल नही हुआ था। इसके लिए वही कॅलक्युलेशन लागु थी। पर अब संख्या मे बदल है।

**अनिल सावंत :-**

संख्यामध्ये बदल झाला असेल तरी तौलानीक संख्या बळानुसार जे प्रत्येक आघाडीला, गटाला जी सदस्य संख्या येत आहे ती घ्यायची का नाही, ह्याच्या बाबतीत तुम्ही मार्गदर्शन मागीतले का ?

**नगरसचिव :-**

लेखी मार्गदर्शन मिळालेले नाही.

**अनिल सावंत :-**

तुम्हाला लेखी मार्गदर्शन मिळणार पण नाही, कारण तुम्ही स्वतः एवढे कन्फ्युज आहात प्रशासन एवढे कन्फ्युज आहे की त्यांना ते लेखी मिळणारच नाही. पण वरवली तुम्ही कोणाकडुन मार्गदर्शन घेतले आहे का? तुमचे सिनियर असतील किंवा काही असतील.

**नगरसचिव :-**

वरवली फोनवरुन घेतले आहे.

**अनिल सावंत :-**

नाशीक महानगरपालिकेचा हायकोर्टाचा जो निर्णय आहे.

**नगरसचिव :-**

तो त्यांनी रिफर करा असे सांगितले.

**अनिल सावंत :-**

मग त्यांनी सांगीतले की, तो मान्य नाही म्हणून मग प्रश्न राहिला कुढे? सदस्याला कोणाला काहीही म्हणू दे, पण तुम्ही तुमच्या नियमाप्रमाणे कामकाज करा.

**लक्ष्मण जंगम :-**

सचिव साहेब, तुम्ही समजवताना ठामपणे समजवले, तर सभागृहाची दिशाभुल होणार नाही, तुम्ही मार्गदर्शन जर मागवले असेल तर ते निश्चित ठामपणे सांगा की, असे आहे.

**नगरसचिव :-**

त्यांनी नाशिकचे तुम्हाला जजमेंट पाठविले आहे, त्यांचा तुम्ही विचार करावा असे फोनवरुन सांगितले आहे.

**जयंत पाटील :-**

त्याप्रमाणे निर्णय घ्या.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, मी आपल्याला विनंती करतो त्या प्रमाणे निर्णय घ्या.

**प्रकाश दुबोले :-**

सचिव साहेब, नियम काय आहे आणि काय करायला पाहिजे हे तुम्ही सांगा फोनवर तुमची कोणाशी काय गोष्टी होतात, समोर कोण होते हे आम्हाला कोणाला माहीत नाही. फोनवरच्या गोष्टीवर सभागृह चालत नाही ज्याला खाजगी निर्णय घ्यायचे असतील ते फोनवर घेतील तुम्ही सचिव म्हणून फोनवरचे निर्णय आम्हाला सांगणार का आणि त्या प्रमाणे सभागृह चालवणार असाल तर तसे सांगा म्हणजे तुम्हाला दररोज फोन येतील प्रत्यकाचे वेगवेगळे तर वेगवेगळे निर्णय घेणार का प्रत्येक वेळेला.

**भगवती शर्मा :-**

इस टाईप के डिसीजन लेकर के हर कमिटियोका आज तक वाट लगाकर रखी है। आपसे हाथ जोडके निवेदन है....

**नगरसचिव :-**

समितीयोका मैने वाट नही लगाया है।

**भगवती शर्मा :-**

आपणे हमेशा निर्णय दो तरिकेके दिए है। आप यह मेरे को बताइए...

**नगरसचिव :-**

सदन मध्ये निर्णय झाला त्याच्यामुळे वाद झाला, माझ्या निर्णयामुळे वाद झालेला नाही.

**भगवती शर्मा :-**

आप हमे बताइए श्री. फ.ब.खान के जो पत्र आपके पास मे है उसके निर्णयानुसार आपकी आजकी कॅलक्युलेशन होनी चाहीए २१ की होनी चाहीए या नही।

**नगरसचिव :-**

श्री. फ.ब. खान के पत्र के हिसाब से...

**भगवती शर्मा :-**

२१ की होनी चाहिए या नही?

**नगरसचिव :-**

जसे निवृत्त झाले तसे घ्यावे असे श्री. फ.ब.खानचे डायरेक्शन आहेत. परंतु त्याच्यात संख्येत बदल झाल्यानंतर खालचे वाक्य आहे. तसेच कोणत्याही क्षणी कोणत्याही कारणाने रिक्त होणा-या जागांवर.....

**भगवती शर्मा :-**

एकने रिझाईन दिया है। एक कोर्ट मे है। एक डिसक्वॉलीफाय हुआ है। अगर यह तीन का चुनाव लगाऐगे या ७९ का लगाऐगे क्या ?

**नगरसचिव :-**

दो का ।

**भगवती शर्मा :-**

दो का चुनाव लगाऐगे ना। ७९ का तो नही लगाऐंगे ना ठिक है जो रिटायर्ड हो रहे है जितनी संख्या उसके नुसार आप लगाऐंगे ना।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, आमच्या गटाचे नामनिर्देशीत सदस्य म्हणून आमचे नाव जाणार आहे तर आमचे नाव शरद केशव पाटील यांचे नामनिर्देशन सदस्य म्हणून मी आपल्याकडे पत्र पाठवत आहे.

**अरुण कदम :-**

मा. महापौर साहेब, संख्याबाबत बदल झाला असेल तरी त्या गुणोत्तरात काही फरक पडत नाही संयुक्त लोकशाही आघाडीच्या त्याच्यामुळे ५ सदस्य इथुन जाणार आहेत. गुणोत्तरात काही फरक पडत नाही जरी दोघांनी राजीनामा दिला.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब, कुठल्याप्रमाणे घेणार त्याची माहिती सभागृहाला द्या.

**अरुण कदम :-**

तौलानीक बदल काहिच होत नाही.

**मा. महापौर :-**

विधी अधिका-यांनीही या बाबतीत सभागृहाला माहीती द्यावी.

**सई वडके :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलते, रेलेटिव्ह स्टेन्थबद्दल ब-याचशा वेळेत महासभेत कनफ्युजन क्रिएट व्हायचे म्हणून बी.पी.एम.सी एक्ट मध्ये ३१ (ए) या प्रमाणे अमेंडमेंट करण्यात आले आणि त्याचे इंटरप्रिटेशनचे काही नाशीक कार्पोरेशनमध्ये ट्रीफ्यु कनफ्युज्न असल्यामुळे २००७ सालामध्ये रिटपीटीशन दाखल करण्यात आले होते आणि ते २५ जुलै २००७ ला जस्टीस श्री. एस.बी. म्हसे आणि श्री. डी.जी. कर्णीक-नाईक साहेबांनी त्यावेळेस डिसीजन दिला होता त्याच्यामध्ये पॅराग्राफ ६ मध्ये आहे ते मी तुम्हाला जास्त वाचुन दाखविते. With the above background we may first consider how the relative strength for being represented would have to be worked out. A an illustration if the strength of general assembly is 108 it will have to be divided by 16 members the strength of the standing committee. This will work out to a quotient of 6 : 75 then take the quotient of 6 : 75 and divide by the number of elected committee councilors to get the relative strength of the standing committee.

**भगवती शर्मा :-**

वह फर्स्ट इलेक्शन था या सेकंड इलेक्शन था यह आप पहिले बताईए।

**सई वडके :-**

सर, ते ह्यात स्पेसीफाय केलेले नाही.

**भगवती शर्मा :-**

तब आप क्यों, एक तो वह गुमराह करते है फिर आप गुमराह करते हो। जब आपको उसमे स्टडी नही है तो आप कैसे कर रहे हो? वह १६ का है वह हम मानते है।

**जयंत पाटील :-**

पहिल्या इलेक्शनला बरोबर आहे. पण आता ८ बाहेर चालले आहेत. ८ च्या नियमाने होणार.

**भगवती शर्मा :-**

इसके पहले आपने क्या कॅलक्युलेशन किया था? ८ की कॅलक्युलेशन की थी या नही इसके पहिलेवाले मे तब आप भी बैठी थी।

**सई वडके :-**

नाही. १६ ने केली आहे.

**भगवती शर्मा :-**

हा तो उसी हिसाबसे आप करीए ना।

**सई वडके :-**

सर, १६ ने केले होते.

**भगवती शर्मा :-**

अभी ८ का २१ के हिसाब से ३७ के हिसाब से करिए।

**सई वडके :-**

१६ ने काय केली होती?

**जयंत पाटील :-**

काय १६ ने केली होती? आम्ही आहोत ना, सभागृहात.

**सई वडके :-**

गेल्यावेळेस २१ ऑक्टोंबर, २००८ ला.

**जयंत पाटील :-**

श्री. फ.ब. खानच्या पत्राप्रमाणे आपण त्यावेळेस निर्णय घेतला होता.

**सई वडके :-**

श्री. फ.ब. खानचे पत्रसुध्दा होयकोर्टाच्या.....

**जयंत पाटील :-**

मॅडम, २००७ ती ऑर्डर आहे आणि श्री. फ.ब. खानचे पत्र २००८ चे आहे.

**भगवती शर्मा :-**

वह हम भी मान्य करते है लेकीन संख्याबदल अभी हुई है उसका इफेक्ट लेकर जा रहे है। लेकीन जितनेका इलेक्शन होगा वह उसीके हिसाब से होना चाहिए, नही की आप १६ के हिसाब से करोगे। अभी यह फर्स्ट कमिटी नही है की, १६ के आप नॉमिनेशन कर रहे है। अभी ८ के कर रहे है। इसलीए ८ के हिसाब से......

**सई वडके :-**

हायकोर्टाने आपल्याला रिलेटीव्ह स्ट्रेन्थ कशाप्रकारे गृहित धरावे रिलेटीव्ह स्ट्रेन्थ ऑफ द रेकग्नाईझ पार्टी कशाप्रकारे करावी ह्याचे कोर्टाने डायरेक्शन दिलेले आहेत. दॅट ईज वाईंडींग अपॉन द कॉर्पोरेशन.

**प्रकाश दुबोले :-**

सचिव साहेब, २००७ चा निकाल आहे. त्यानंतर दोन वर्षे झाली. मग शासनाला त्याच्यात अमेडमेंट केली नाही का? कायद्यात त्या पुस्तकात.

**नगरसचिव :-**

पुस्तकात तशी काय अमेडमेंट नाही.

**प्रकाश दुबोले :-**

पण शासनाने कुठे अमेडमेंट केली असेल जर आपल्याला बायडींग असेल, दोन वर्षे झाली. दोन वर्षात कायद्यात काही बदल झाले असेल की नाही?

**नगरसचिव :-**

विधी मॅडमने जे बोलले ते अमेडमेंट ह्याच्यात आली आहे. कोर्टाचे जजमेंट आहेच.

**प्रकाश दुबोले :-**

त्यांनी कोर्टाचा निकाल वाचून दाखवला. जर शासनाने ते अमेडमेंट घेतले असेल तर ती यायला पाहिजे. जुलै, २००७ ला निकाल लागला. २००९ जुलै होउन गेले आहे. याला दोन वर्षे झाली. जर कोर्टाचा निकाल बंधनकारक असेल तर शासनाने अजून अमेडमेंटमध्ये का घेतले नाही? जर अमेडमेंट झालेली नाही तर त्याचा तुम्ही विचार कशाला करता? या निकालाचा, विचार तुम्ही कशाला करता, अमेंडमेंट झाले नाही तर?

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, नाशिक हायकोर्टाचा निकाल आणि श्री. फ. ब. खान साहेबांचे जे पत्र आहे ते एकदम क्लिअर आहे आणि विधी अधिकारी मॅउमने तेच मत सांगितले तो शेवटचा पॅरा मी फक्त वाचतो. पूर्ण पत्र वाचत नाही. कारण ते बऱ्याचवेळा येवून गेलेले आहे. कोणत्याही समितीच्या, कोणत्याही कारणामुळे रिक्त होणाऱ्या जागांवर निवृत्त झालेला सदस्य ज्या मान्यताप्राप्त पक्षाचा नोंदणीकृत पक्षाचा गटाचा, आघाडीचा किंवा फ्रंटचा असेल त्याच मान्यताप्राप्त पक्षाच्या नोंदणीकृत पक्षाचा, गटाचा आघाडीचा किंवा फ्रंटच्या सदस्यास नामनिर्देशित करणे अपेक्षित आहे. मात्र अशावेळेस पूर्वीच्या तुलनेत पक्षाच्या गटांच्या तौलानिक संख्येत बदल झालेला नसावा. आता याठिकाणी परिस्थिती अशी आहे की, तौलानिक संख्येमध्ये बदल झालेला आहे. त्यामुळे हे पत्र या येथे ॲप्लीकेबल होणार नाही. नाशिक हायकोर्टाचा जो निकाल आहे त्याप्रमाणेच निर्णय द्यावा लागेल.

**जयंत पाटील :-**

सचिव साहेब, तुम्ही तुमच्या निर्णयाप्रमाणे चला. पिठासीन अधिकारी फक्त निर्णय जाहिर करतील. पिठासीन अधिकारी तुम्हाला डायरेक्शन देवू शकत नाही.

**अनिल सावंत :-**

पिठासीन अधिकाऱ्याच्या मताला महत्व आहे. म्हणून त्यांना तिथे बसवलेले आहे.

**एस. ए. खान :-**

आता येथे विधी अधिकाऱ्यांनी स्पष्ट सांगितलेले आहे. त्यांनी आपले स्पष्ट मत दिलेले आहे की, १६ प्रमाणे कॅलक्युलेशन करता यावी.

**अरुण कदम :-**

सचिवजी, सभागृह नियमाप्रमाणे चालवावे. विधी मॅडमने तुम्हाला जो सल्ला दिला असेल तर त्या नियमाप्रमाणे चालवा. एवढे काय त्याच्यामध्ये घोळ घालण्यासारखे काही नाही.

**जयंत पाटील :-**

आम्ही आजच्या संख्याबळानुसार चाललोय. तुमची आज २१ संख्या आहे हे आम्हाला मान्य आहे आणि त्यानुसारच आमचे कॅलक्युलेशन चालु आहे. निवडणूक १६ ची घेता का, तुम्ही पुन्हा तर १६ ची घेउन टाका. आमची हरकत नाही.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेंब, मला मा. आयुक्त साहेबांना विचारायचे आहे की, आता फेब्रुवारीमध्ये जवळ जवळ अडीच वर्षे आपल्याला होत आली. प्रत्येकवेळी कुठलीही समिती स्थापन करताना हाच गोंधळ दिसतो. प्रशासनाची कुठलीच ठाम भुमिका नसते. आता पण तुम्ही सभागृह सुरु झाल्यानंतर १० मिनिटांचा वेळ नगरसेवकांकडे मागता की, या विषयावर चर्चा करण्यासाठी १० मिनिटे वेळ द्या. ही चर्चा अगोदर व्हायला पाहिजे होती. हा गोंधळ प्रत्येकवेळी, प्रत्येक समितीसाठी असतो आणि तो ह्याच्यापुढे टाळला गेला पाहिजे. याच्यापुढे आणि मी आयुक्तांना विनंती करेन, आपण येथे प्रशासनाची भूमिका मांडावी.

**जयंत पाटील :-**

आपल्याला माहितीसाठी सांगतोय, काल रात्री ९.०० वाजेपर्यंत आमची सचिवांशी या विषयावर चर्चा झाली आणि जे कॅलक्युलेशन आम्ही आज करतोय तेच कॅलक्युलेशन त्यांनी सांगितलेले आहे. पण रात्रीमध्ये त्यांचे कॅलक्युलेशन बदललेले आहे. त्यांना काय स्वप्नात आले की नाही हे माहित नाही, हे कॅलक्युलेशन आणि नाशिक हायकोर्टाची ऑर्डर आज जी दाखवत आहे ती ऑर्डर मागच्या वर्षी का दाखवली नाही? ती ऑर्डर तर २००७ साली निघालेली आहे. त्यावेळी श्री. फ. ब. खान लेटर तुम्ही वापरलेले नाही?

**अरुण कदम :-**

मा. महापौर साहेब, कॅलक्युलेशन कधीही केले तरी जी असणार आहे तीच नियमाप्रमाणे होणार आहे. रात्री केली काय, सकाळी केली काय, पण फायनल काय झाली ते सांगा. तुम्ही कधी केली त्याला अर्थ नाही. आता काय कॅलक्युलेशन आहे? ते सांगून आता निर्णय लावा.

**जयंत पाटील :-**

नाही. आमची चर्चा झाल्यानंतर तो आकडा बदलतोय.

**अनिल सावंत :-**

८ प्रमाणे जर कॅलक्युलेशन केले तर १६ जणांच्या स्थायी समितीमध्ये तौलानिक संख्याबळानुसार प्रतिनिधीत्व राहणार नाही. हे स्वयंस्पष्ट आहे. स्थायी समिती किती जणांची आहे तर १६ जणांची. तौलानिक संख्याबळाने रिटायर्ड झाल्याने त्यानुसार प्रतिनिधीत्व मिळायला पाहिजे.

**जयंत पाटील :-**

रिटायर्ड ८ होत आहेत.

**भगवती शर्मा :-**

आप ८ के हिसाबसे ले रहे है, या १६ के हिसाब से?

**अनिल सावंत :-**

प्रत्येकवेळी आपल्याला फायदेशीर निर्णय बजावून घ्यायचा हे प्रत्येकवेळी चालणार नाही.

(सभागृहामध्ये गोंधळ)

**मा. महापौर :-**

तुमचे ज्याप्रमाणे मत आहे त्याप्रमाणे सदस्यांची मागणी करा.

**दिनेश नलावडे :-**

प्रत्येक सदस्य वेगवेगळे आकडे सांगतोय. मा. महापौर साहेब, विधी मॅडमने आपल्याला जी सुचना केली, आदेश दिले त्याचे तुम्ही पालन करा. एवढी सगळी आपल्याकडे यंत्रणा असतानासुध्दा गोंधळ चालू होता. प्रत्येक सभासदांमध्ये प्रत्येक वेळेस इलेक्शनमध्ये असेच होते.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, सन्मा. आयुक्त साहेब, या विषयावर काही बोलत नाही तर साहेब आपण या विषयावर सभागृहाला थोडेसे मार्गदर्शन द्या.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. महापौर साहेब, याठिकाणी विधी मॅडमने जो निर्णय सांगितलेला आहे हायकोर्टाचा, तो कोर्टाचा पहिल्यांदा जेव्हा स्थायी समिती गठीत होते. ते गठन करण्यामध्ये सदस्य संख्या कशी असावी, त्यासंबंधी तो कोर्टाचा निर्णय आहे. १६ जणांच्या समितीमध्ये १०८ लोकांची कशाप्रकारे तौलानिक संख्याबळ येते हे त्याच्यात लिहलेले आहे. गेल्या वर्षी आपले ८ लोक रिटायर्ड झाल्यानंतर ज्यांची लोक गेली जितके तितकेच लोक परत आली. तेव्हा ८ च्या संख्याबळानुसार आतमध्ये आले. आता श्री. फ. ब. खान ह्यांचे पत्र जर वाचले शेवटच्या चार ओळी वाचा. कारण या निर्णयामध्ये, कोर्टाच्या निर्णयामध्ये असे स्पष्ट म्हटले आहे की, गर्व्हमेन्टने तशा कायदेशीर अमेडमेंट कराव्यात आणि ते अमेडमेंट आहेत. म्हणजे २००७ च्या हिशोबाने गर्व्हमेन्टने अमेडमेंट केलेले आहे. आणि २००८ ला जे पत्र दिलेले आहे त्याच्यामध्ये स्पष्ट म्हटलेले आहे. परंतु, कोणत्याही

समितीच्या, कोणत्याही कारणामुळे रिक्त होणाऱ्या जागेवर निवृत्त झालेला सदस्य ज्या मान्यताप्राप्त पक्षाचा किंवा नोंदणीकृत पक्षाचा किंवा गटाचा किंवा आघाडीचा किंवा फ्रंटचा असेल त्याच मान्यताप्राप्त पक्षाच्या नोंदणीकृत पक्षाच्या, गटाचा, आघाडीचा किंवा फ्रंटच्या सदस्यास नामनिर्देशित करणे अपेक्षित आहे. म्हणजे ज्यांचे जे सदस्य गेले तेवढे त्यांचे सदस्य घ्यायचे असे त्यांनी स्पष्ट म्हटलेले आहे आणि शेवटच्या ओळीमध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, मात्र अशावेळेस म्हणजे अशी वेळ कधी येईल, ज्यावेळेस सदस्य संख्या कमी होईल. अशावेळेस पूर्वीच्या तुलनेने पक्षांच्या, गटाच्या तौलानिक संख्येत बदल झाला नसावा तर याठिकाणी राष्ट्रवादीचे नगरसेवक घटले आणि लोकशाही आघाडीचेही घटले त्याच्यामुळे आताची तौलानिक संख्या तुम्हाला ८ च्या हिशोबानेच घ्यावी लागेल. १६ च्या हिशोबाने घेता येणार नाही आणि जर १६ च्या हिशोबाने घ्यायची झाली तर अगोदरच्या सर्व सदस्यांनी राजीनामे द्यायचे म्हणजे १६ प्रमाणे तुम्हाला तौलानिक संख्याबळ मिळेल. या पत्रामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, ज्या पक्षाचे जे सदस्य निवृत्त होतील तेच सदस्य येतील. परंतु, अशावेळेस पूर्वीच्या तुलनेने पक्षाच्या किंवा गटाच्या तौलानिक संख्येत बदल झालेला नसावा. मग याठिकाणी बदल झालेला आहे. मग बदल झाल्यामुळे याठिकाणी तुम्ही आजची तौलानिक संख्या काढता आणि ती जागा किती भरत आहात तर ८-८ व ह्या जागांसाठी नामनिर्देशन आहे ना. १६ जागांसाठी नाही म्हणून याठिकाणी ८ जागांसाठीच तुम्हाला तौलानिक संख्याबळ घ्यावे लागेल. हे कायदेशीर आहे आणि ह्याच्यात जर काय अडचण आहे तर हा विषय शासनाकडे पाठवा. चालू दे थोडे दिवस स्थायी समिती, तुम्हाला जर असे वाटतय ह्याच्यात वेगळा काही तरी निर्णय होईल. कारण कोर्टाचा निर्णय २००७ चा तो कन्सीडर झाला त्याच्यात अमेंडमेंट झाले आहे कायद्यामध्ये. सन २००८ चे हे पत्र आहे. या पत्रानुसार स्पष्ट म्हटलंय, परंतु, अशावेळेस पूर्वीच्या तुलनेच्या, पक्षाच्या किंवा गटाच्या तौलानिक संख्येत बदल झालेला नसावा. मग ह्याठिकाणी तुम्ही मान्य करता की, तौलानिक संख्येत बदल झाला आहे. मग तौलानिक संख्येत बदल झाल्यानंतर याठिकाणी तुमचा कोशन बदलला.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, आता सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेबांनी जे मत मांडलेले आहे. त्यामध्ये थोडेसे कनफ्युजन आहे. श्री. फ.ब. खानचे जे पत्र आहे की, शासनाने नंतर जे पत्र काढले नाशिक हायकोर्टाच्या निकालानंतर शासनाला हेच अपेक्षित होते. टोटल स्थायी समितीमध्ये ज्या कमिट्या होतात त्याच्यामध्ये त्यावेळी पूर्ण कमिटी विचारात घेतली जाते. किती सदस्य निवृत्त होतात ते विचारात घेतले जात नाही. त्या कमिटीमध्ये तौलानिक संख्याबळानुसार प्रत्येक गटाला प्रतिनिधीत्व मिळावे आणि त्या हिशोबाने हे पत्र काढलेले आहे. आज जर ८ चा आपण विचार केला तर ते तौलानिक संख्याबळानुसार प्रतिनिधीत्व राहणार नाही, त्या कमिटीमध्ये. फर्स्ट स्टेजला तुमच्या युडीमध्येच ते फेल होउन जाईल. तौलानिक संख्याबळामध्ये बदल झालेला आहे. म्हणजे आजच्या डेटला तौलानिक संख्याबळानुसार प्रत्येक गटाला किती प्रतिनिधीत्व मिळावे, त्याप्रमाणे ती समिती स्थापन व्हायला पाहिजे आणि त्याच्यासाठी १६ जणांचाच विचार करायला पाहिजे हे आमचे पूर्ण संयुक्त लोकशाही आघाडीचे मत आहे.

**भगवती शर्मा :-**

सचिवजी, आपने जब पिछली बार इलेक्शन लगाया था, यही संख्या के अनुसार वापस आपने गोंधळ किया था। तब हम कोर्ट के अंदर गए थे। बादमे श्री. फ.ब. खानने यह पत्र दिया था। यही संख्याबल के अनुसार आपने कॅलक्युलेशन किया था। तब किसीकी सीट कम हो रही थी, किसी की ज्यादा हो रही थी। तब श्री. फ.ब. खान ने यह पत्र दिया था की, संख्याबल के अंदर मे अगर परिवर्तन नही होता है तो जिसके जितने सदस्य जाते है उतने ही रहेंगे। पिछली बार का भी गोषवारा देख लिजिए। आपने यही चूक की थी। इसलिए आज संख्याबल मे जो फरक हो रहा है जो २१ हो रहा है, ३७ हो रहा है उसका इफेक्ट लेते हुए ८ से कॅलक्युलेशन किजीए क्योंकी गोषवारा मे भी आप ८ ही सदस्य निवृत्त कर रहे है। अगर १६ कर रहे है तो १६ के अनुसार लिजिए। नही तो ८ के हिसाबसे संख्याबल के अनुसार जिसके जो जितने सदस्य मिलते है उनको आप प्रतिनिधीत्व दिजीए।

**लक्ष्मण जंगम :-**

८ के हिसाब से अगर लिया तो ८ के हिसाब से सबको किधर प्रतिनिधीत्व मिलता है? श्री. फ.ब. खान साहेबांनी त्यांच्या पत्रामध्ये असे म्हटले आहे की, सर्वांना प्रतिनिधीत्व मिळायला पाहिजे. मग तसे कुठे मिळतय.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, प्रश्न १६ किंवा ८ कॅलक्युलेशनचाच आहे. प्रतिनिधीत्व द्यायचे आहे. प्रत्येक गटाला, प्रत्येक आघाडीला १६ चाच विचार करायला लागेल. कारण तौलानिक संख्याबळामध्ये बदल झालेला आहे. पूर्वी जी ७९ सदस्यांची ही सभा होती ती आता ७७ ची झालेली आहे. ७७ मध्ये प्रत्येक गटाला प्रतिनिधीत्व त्यांची जी आघाडी आहे. त्यांचे जे सदस्य आहे त्याप्रमाणात मिळायला पाहिजे. त्याप्रमाणे १६ सदस्यांच्या कमिटीमध्ये संयुक्त लोकशाही आघाडीचे आठ बसले आहेत. राष्ट्रवादीचे ४, बीजेपी - २, शिवसेना - १ आणि अपक्ष गट - १ असे सदस्य बसत आहेत. तेवढे ८ जे रिटायर्ड होणार आहेत तेवढे मायनस करून

उरलेल्या सदस्यांची त्याठिकाणी नियुक्ती करण्यात यावी तरच तौलानिक संख्याबळानुसार प्रतिनिधीत्व प्रत्येक गटाला मिळेल.

**भगवती शर्मा :-**

आपने वृक्ष प्राधिकरण का इलेक्शन कितने सदस्योका लगाया है?

**नगरसचिव :-**

७७ के हिसाब से १३ सदस्यो का लगाया है।

**भगवती शर्मा :-**

क्योंकी १३ के १३ सदस्य गए और १३ के हिसाब से वापस कॅल्क्युलेशन किया है। अभी स्थायी समितीमे कितने सदस्यो का आपने चुनाव लगाया है?

**अनिल सावंत :-**

१३ के हिसाब से नही। अभी भी तौलानिक संख्याबळ मे बदल हुआ इसलिए हमारा एक कम हो गया।

**भगवती शर्मा :-**

ठिक है। आप हमे बात तो करने दिजिए।

**अनिल सावंत :-**

उन्होने हा बोला। जितने रिटायर्ड हुए है उतनेका ही किया ऐसे बोला। सबकुछ उनसे हा मत कराओ उनको टेन्शन मे लेके सबकुछ हा मत कराओ।

**भगवती शर्मा :-**

जितने सदस्य जाते है उतने का ही इलेक्शन आप संख्याबळ के अनुसार लगाते है। उसमे १३ गए, संख्याबल के अनुसार आपने उनको प्रतिनिधीत्व दिया। स्थायी समिती मे ८ सदस्य गए की १६ गए यह आप पहिले बताईए।

**नगरसचिव :-**

८ गए।

**भगवती शर्मा :-**

तो ८ के अनुसार प्रतिनिधीत्व देंगे या १६ के अनुसार रिटायर्ड कितने हुए। इलेक्शन कितने का है?

**नगरसचिव :-**

इलेक्शन ८ का है।

**भगवती शर्मा :-**

तो ८ के अनुसार संख्याबल मे जो फरक हुआ उसको प्रतिनिधीत्व देंगे या वापस १६ के इलेक्शन के नुसार देंगे।

**नगरसचिव :-**

१६ का इलेक्शन नही है।

**एस. ए. खान :-**

सचिव साहेब, जे विधी अधिका-यांनी सांगितले आहे त्याप्रमाणे तुम्ही करा. कायद्याप्रमाणे १६ प्रमाणे आहे ते करा.

**दिनेश नलावडे :-**

सचिव साहेब, प्रत्येक वर्षी स्थायी समितीमधून ८ सदस्यच कमी होतात. पण आपण पहिल्यावर्षी जो आकडा ठरवलेला आहे १६ चा त्याचा हिशोबानेच होणार. आपण याठिकाणी सचिव म्हणून बसला अहात. प्रत्येक सदस्य आपले वाढवण्यासाठी काहीतरी बोलतील आणि तुम्ही ते आपली मान हलवता हे बरोबर नाही. तुमच्याजवळ नियम आहे ते तुम्ही वाचून दाखवले, विधी मॅडमने वाचून दाखवले नियमाप्रमाणे आपण इलेक्शन चालू करा.

**जुबेर इनामदार :-**

सचिव साहेब, एका सदस्याने राजिनामा दिला तर आपण १५ करता का? समिती १५ ची होते का? तर १६ ची च राहिल ना। कारण आपण नविन सदस्य परत घेणारच ना. गणित बसवताना आपल्याला १६ चे बसवायला लागेल.

**नगरसचिव :-**

जे निवृत्त होणार आहेत त्यांच्या जागेवर फक्त नविन सदस्य येणार आहेत.

**जुबेर इनामदार :-**

बरोबर आहे की, नाही. १५ तर करत नाही १ कमी झाला म्हणून.

**भगवती शर्मा :-**

निवृत्त हुआ उसकी कॅल्क्युलेशन के संख्याबळ मे आप नही पकड रहे हो। क्योंकी उसका प्रतिनिधीत्व अलग है। लेकीन इलेक्शन मे आप संख्याबल मे अलग कर रहे हो। इसके लिए सही बात आप ८ से ही किजिए।

**अनिल सावंत :-**

यह इलेक्शन नही है। नेमणूक है। मा. महापौर साहेब, १६ जणांप्रमाणे घ्या त्याप्रमाणे प्रतिनिधीत्व मिळेल.

**जुबेर इनामदार :-**

सचिव साहेब, तुम्हाला तो निर्णय घ्यावा लागेल. तुम्ही सचिव आहात. विधी मॅडमने जे तुम्हाला सांगितले त्याप्रमाणे चाला.

**अरूण कदम :-**

सचिव साहेब, सभागृह नियमाप्रमाणे चालवणार आहात की, दबावामध्ये चालवणार आहात?

**मिलन पाटील :-**

सचिव साहेब, रात्री जे तुम्ही कॅल्क्युलेशन केले ते तुमचे कॅल्क्युलेटर कुठे आहे? आणि आता दिवसा बदलले कसे?

**नगरसचिव :-**

कलम ३१(३) मध्ये जी तरतुद आहे ती वाचून दाखवतो. अशा पक्षाच्या किंवा गटाच्या वतीने नामनिर्देशन करायच्या पालिका सदस्यांच्या संख्येबाबत कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास त्याबाबतीत महापालिकेचा निर्णय अंतिम असेल असे ३१ कलम (३) मध्ये तरतुद आहे.

**मिलन पाटील :-**

सचिव साहेब, जेष्ठ नगरसेवक प्रफुल्ल पाटील साहेब ह्यांनी जो निर्णय सांगितलेला आहे आणि ते वाचून दाखवलेले आहे ते योग्य आहे. त्याप्रमाणे तुम्ही चाला. कोणाच्या दबावामध्ये येउ नका. कालच कॅल्क्युलेशन केले होते ते ८ चे होते आणि झाले १६ चे. त्याच्यामध्ये बदल कसा काय झाला. आपण काहीतरी ठाम निर्णय घ्या.

**प्रफुल्ल पाटील :-**

सचिव साहेब, आपण एक्सरसाईज बरोबर करत नाही. हा गोंधळ कशामुळे झाला आणि त्यावेळी पण मी तुम्हाला बोललो होतो. ज्यावेळेला चिठ्ठ्या काढल्या. चिठ्ठया कशा काढतात. तो सेक्शन पर्टीक्युलर तुम्ही वाचा. म्हणजे सभापतीला योग्य वाटेल त्यारितीने, त्यावेळेला तुम्ही सभापतींना सल्ला दिला नाही की, आता तौलानिक संख्याबल आलेले आहे. त्याच्यामुळे तुम्ही चिठ्ठ्या काढताना आघाडीच्या गटाच्या चिठ्ठ्या वेगळ्या करायला पाहिजे होते आणि भाजपाच्या इतर राष्ट्रवादीच्या त्यांच्या चिठ्ठ्या वेगळ्या करायला पाहिजे होत्या आणि त्याच्यातून तुम्ही अर्धे अर्धे उचलले असते तर त्यावेळी पाच कॉंग्रेसचे पाच बाहेर गेले नसते. सगळा घोळ हा झाला हा त्यावेळी झालेला आहे. आता तौलानिक संख्याबळामुळे पकडले तर त्याच्यामध्ये एकच नुकसान होत आहे आघाडीला, त्यावेळी तुम्ही जर ते चारच, कारण कसे आहे, ठरवण्यातच कशापध्दतीने चिठ्ठ्या काढायच्या हे संपूर्ण अधिकार सभापतीला आहेत. आता तुम्ही एकदम १६ टाकल्यात आणि त्याच्यातून काढल्यामुळे विषम संख्येने बाहेर निघाले. मग तौलानिक संख्याबळानुसारच ते बाहेर निघायला पाहिजे होते. म्हणजेच आघाडीच्या चिठ्ठ्या वेगळ्या करायला पाहिजे होत्या आणि राष्ट्रवादी आघाडीच्या वेगळ्या करायला पाहिजे होते आणि त्याच्यातून तुम्ही चार चिठ्ठ्या वेगळ्या काढायला पाहिजे होत्या. मी तेव्हा तुम्हाला बोललेलो.

**नगरसचिव :-**

पण अपक्षांची एक चिठ्ठी असेल त्याच्यावर .....

**प्रफुल्ल पाटील :-**

अपक्षांशी संबंध कुठे आला? त्या चारामध्ये जर ते राष्ट्रवादीशी सलग्न होते. ते सेपरेट झाले तर आता सेपरेटच्या हिशोबाने ते येणार. आजही ते तीनच्या हिशोबाने त्यांचा एक येतो.

**नगरसचिव :-**

शिवसेनेची एकच चिठ्ठी होती.

**प्रफुल्ल पाटील :-**

एक आहे तर तुम्हाला एक ठेवावेच लागेल. तौलानिक संख्याबल ज्यांचे कमी होत आहे. ज्याला एकापेक्षा दोन आहेत त्याची अर्धी निघेल. एक मेंबर आहे त्याला काय अर्धा कापणार. तुम्ही म्हणून जिथे आठ आहेत त्यांच्या चार काढायला पाहिजे होत्या. ज्याच्या चार आहेत त्यांच्या दोन काढायला पाहिजे होत्या. ज्यांच्या दोन आहे आहेत त्यांची एक काढायला पाहिजे होती. ज्यांचे एक आहे त्यांचे एकेकच राहतात. म्हणून तौलानिक संख्याबळानुसार तुमची सोडत निघाली नाही आणि त्याच्यामुळे पाच सदस्य कॉंग्रेस पक्षाचे बाहेर गेले

आणि नेमके ह्या टाईममध्ये परंतु, कोणत्या वेळेस जर पक्षाच्या तौलानिक संख्येत बदल झाला तर मात्र ह्याला हिशोब त्या हिशोबाने लागणार. शेवटचे वाक्य आहे ते एकदम पर्टीक्युलर आहे. त्या हिशोबानेच होणार.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, मागच्या वेळेस काँग्रेसचे पाच बाहेर कुठे गेले होते. तिघेच गेले होते.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, यामध्ये ज्या ज्या वेळेला संदस्य संख्या बदलते आणि ज्यावेळेला सदस्य संख्या बदलत नाही प्रत्येक पार्टीचे त्यावेळेला विचार करायचा असतो. ८ चा ज्यावेळेला सदस्य संख्येत बदल होतो त्यावेळेला नविन इलेक्शन सुरु झालेले आहे असे समजून १६ विचार करायचा आणि नाशिक हायकोर्टाची ऑर्डर बायन्डेड आहे आणि नाशिक हायकोर्टाच्या ऑर्डर नंतरच श्री. फ.ब. खान साहेबांचे हे पत्र आहे. ज्यावेळेला सदस्य संख्येमध्ये बदल होत नाही. त्यावेळेला ८ प्रमाणे करायचे. ज्यावेळेला पार्टीच्या सदस्य संख्येमध्ये बदल होतो त्यावेळेला १६ चा विचार पण करायला पाहिजे. असे जर तुम्हाला खात्री वाटत नसेल तर गर्व्हमेन्टचे मार्गदर्शन मागवून करा.

**भगवती शर्मा :-**

अब यह १६ का किधर लिखा हुआ है। कौनसे निर्णय मे है? आप भी इसी टाईप का एक्सप्लेमेशन दे रहे हो और आप सभागृह को दिशाभूल कर रहे है।

**मा. आयुक्त :-**

मै सिर्फ आपको कानुन का निर्णय बता रहा हू। आप गर्व्हमेन्टसे मार्गदर्शन से मँगाओ।

**भगवती शर्मा :-**

आप वही बताईए ना, १६ का कहापर लिखा हुआ है। आप भी दिशाभूल कर रहे हो।

**मा. आयुक्त :-**

जहॉ सदस्य संख्या चेंज होती है। वहा नया इलेक्शन शुरु होता है।

**भगवती शर्मा :-**

आज तक यही होता आ रहा है, सभागृह की दिशाभूल करते करते आज यह स्थिती आयी है।

**मा. आयुक्त :-**

कोई भी आदमी कानुन बदल नही सकता।

**भगवती शर्मा :-**

तो बताईए कानुन मे कहॉ १६ लिखा हुआ है।

**मा. आयुक्त :-**

जहा पार्टी पॉलीटीक्स मे इसके पास गए, उसके पास गए तो कानुन ही कानुन होता है। वह गर्व्हमेन्टसे मार्गदर्शन मँगाकर आप करो।

**अरुण कदम :-**

मा. आयुक्त साहेबांनी स्पष्ट निर्देश दिलेले आहेत. त्याप्रमाणे पिठासीन अधिकाऱ्याने निर्णय घ्यावा.

**जयंत पाटील :-**

पिठासीन अधिकारी निर्णय देवू शकत नाही.

**अरुण कदम :-**

सचिव साहेब, सभागृहाचा भरपूर वेळ घेतलेला आहे. आयुक्तांनी स्पष्ट निर्देश दिलेले आहेत.

**जयंत पाटील :-**

तुम्ही निर्णय आम्हाला सभेमध्ये देवू नका.

**भगवती शर्मा :-**

साहब, आपने निर्णय देकर अभी क्यों दिशाभूल की?

**मा. आयुक्त :-**

जरुरी लागली तर गर्व्हमेंटचे मार्गदर्शन मागवा असे म्हंटले.

**जयंत पाटील :-**

आम्हाला कुठे जायचे काय जायचे हे सर्व ठाउक आहे. कृपया तुम्ही आम्हाला सांगु नका.

**मा. आयुक्त :-**

आपल्याला कायदेशीर माहिती सांगितली.

**अरुण कदम :-**

आयुक्त हे एक्झीक्युटेड ऑफीसर आहे. मा. महापौर साहेब, तुम्ही तुमचा निर्णय वाचून दाखवा.

**मा. महापौर :-**

तुम्ही तुमचे मत द्या.

**जयंत पाटील :-**

महापौर हे निर्णय देवू शकत नाही. तुम्ही श्री. फ.ब. खानचे लेटर आहे त्याप्रमाणे चला.

**अनिल सावंत :-**

तुम्ही सभेचे आदेश पण देवू शकत नाही.

**दिनेश नलावडे :-**

कायद्याने जावू द्या. कोणाच्या दडपणाखाली जावू नका.

**एस. ए. खान :-**

आपल्याला जे सांगितलेले आहे त्याप्रमाणे करा.

**जयंत पाटील :-**

या महापालिकेमध्ये कुठलीही गोष्ट नियमाप्रमाणे झालेली नाही म्हणून महिला बालकल्याण समिती थांबलेली आहे म्हणून प्रभाग समित्या थांबलेल्या आहेत आणि इतर गोष्टी थांबणार आहेत. ह्याला कारणीभुत कोण?

**नगरसचिव :-**

माझ्यामुळे थांबलेली नाही. समिती माझ्यामुळे थांबलेल्या नाहीत.

**अरूण कदम :-**

नियमाप्रमाणे न चालणारी पालिका बरखास्त करण्याची मी शिफारस करतो.

**जयंत पाटील :-**

तुमच्यामध्ये तेवढी क्षमता नाही.

**अरूण कदम :-**

मा. सभागृह नेते ह्यांनी सांगितले आहे, आपली पालिका नियमानुसार चालत नाही तर नियमानुसार न चाललेली पालिका बरखास्त करण्याची शिफारस करतोय.

**जयंत पाटील :-**

करून टाका. नियमाप्रमाणे चालत असते तर सगळ चालले असते.

**भगवती शर्मा :-**

ही पालिका तुम्ही कोर्टामध्ये घ्या आणि तुम्ही ही पालिका कोर्टामध्ये चालवा.

**अनिल सावंत :-**

मग ह्याला कारणीभुत कोण?

**नगरसचिव :-**

सभागृहामध्ये जर एक मत होत नसेल तर शासनाकडून मार्गदर्शन मागवावे असे माझे मत आहे.

**अरूण कदम :-**

मा. महापौर साहेब, आपण निर्णय द्या. ज्यांना कोर्टात जायचे आहे ते कोर्टात जातील.

**लक्ष्मण जंगम :-**

सचिव साहेब, तुम्ही तुमचे मत तरी मांडा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटीलजींनी पण तेच सांगितले होते की, एखादा गोंधळ होत असेल तर शासनाच्या मदतीने परत ते कोर्टात जायला नको आपण दोन दिवसासाठी सभा तहकूब करून आपण शासनाचे मत जाणून घेउ.

**अरूण कदम :-**

कशाला? तुमच्या निवडणूका नियमात नाही म्हणून.

**अनिल सावंत :-**

तुम्ही तुमचा नियम ठरवा. जाउ द्या ना कोर्टात.

**दिनेश नलावडे :-**

तुम्ही तुमच्या नियमाने चला. जाणारे कोर्टामध्ये जातील.

**अनिल सावंत :-**

त्यांना जाउ दे ना कोर्टामध्ये.

**जयंत पाटील :-**

आम्हाला कोर्टात जायची गरज नाही.

**अरूण कदम :-**

मा. महापौर साहेब, तुम्ही सभा तहकुब करू शकत नाही.

(सभागृहात गोंधळ)

**अरूण कदम :-**

